


# शालेय शिक्षण विभाग

## महाराष्ट्र शासन

## अर्थसंकल्प : २०१५-१६



समर्थन




**समर्थन**

**अर्थसंकल्प अध्ययन केंद्र**

कार्यालयीन पत्ता: समर्थन, ११५, धुरी कॉमर्स प्लाझा, वसई रोड रेल्वे स्थानकासमोर, वसई (पू),

ठाणे -४०१ २०८ ✆ ०२५०-२३९०१०३/४

Email: samarthanmumbai97@gmail.com, info@samarthanadvocacy.org

Website: www.samarthanadocacy.org

# समर्थन

स्व. सदानंद वर्दे
(संस्थापक, अध्यक्ष)

अध्यक्ष : श्री. चंद्रशेखर प्रभू
उपाध्यक्ष : श्री. टी. के. चौधरी
कार्याध्यक्ष : श्री. विवेक पंडित

**- संपादक -**
**मुक्ता भारती**
**-विश्लेषक-**
**रुपेश कीर (९८९२९३९६१७)**

नोंदणी क्रमांक:

पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी

प्रकाशक (पत्रव्यवहार):
समर्थन – ११५-धुरी कॉमर्स प्लाझा, वसई रोड
रेल्वे स्थानकासमोर,
वसई (पू), ठाणे – ४०१ २०८

दूरध्वनी: ०२५०-२३९०१०३/४
Email: samarthanmumbai97@gmail.com
www.samarthanadvocacy.org

## लोकशाही बळकट करण्याकरिता
## उपेक्षितांचे 'समर्थन'

### समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन'. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

### 'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर

- ◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.
- ◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.
- ◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.
- ◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.
- ◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.
- ◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.
- ◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.
- ◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.
- ◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# आजच्या शिक्षणाचे वास्तव

## प्राथमिक शिक्षणाचा अहवाल:

- राज्यात प्राथमिक शिक्षण देणाऱ्या ९६ १७९ शाळा आहेत. त्यापैकी ७० टक्के शाळा ह्या शासनाच्या आहेत. तर २९.३ टक्के शाळा ह्या खाजगी स्वरुपाच्या आहेत.
- आजही ६७४ प्राथमिक शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय नाही.
- २ हजार ७९० शाळा अजूनही रस्त्याला जोडलेल्या नाहीत.
- २२ हजार ६९९ शाळांना कुंपण भिंत बांधलेली नाही.
- महिला सबलीकरण, महिला सुरक्षिततेची भाषणं करणाऱ्या शासनाच्या राज्यात २ हजार ३०५ शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र शौचालय नाही.
- दुर्बल, अपंग यांचे पालकत्व संविधानाने शासनाकडे दिलेले आहे मात्र आजही ७३ हजार ४८० शाळांमध्ये अपंग विद्यार्थ्यांसाठी उतरंड बांधलेली नाही.
- इ-गव्हर्नन्स, डिजिटल महाराष्ट्राचा उद्घोष करणाऱ्या शासनाच्या राज्यात ४७ हजार ५१३ शाळांमध्ये संगणक प्रशिक्षण दिले जात नाही. तर ८२ हजार ७१४ उच्च प्राथमिक शाळांमध्येही, संगणक प्रशिक्षणाची सोय केलेली नाही.
- १६ हजार ८३२ शाळांमध्ये मुलांना खेळण्यासाठी खेळाचे मैदान उपलब्ध नाही.
- ९६ हजार १७९ शाळांपैकी २ हजार ७९० शासकीय व अनुदानित शाळांमध्ये आजही मध्यान भोजन दिले जात नाही.
- शासनाच्या २९ हजार २३९ शाळांमध्ये मुलांना शासनाकडून क्रमिक पुस्तके पुरवली जात नाहीत.

## माध्यमिक शिक्षणाचा अहवाल:

- राज्यामध्ये २३ हजार ७५३ माध्यमिक शिक्षण देणाऱ्या शाळा आहेत.
- एकूण माध्यमिक शाळांपैकी आजही ५२ शाळा ह्या एकशिक्षकी आहेत.
- १२ हजार १७४ शाळांमध्ये संगणक व इंटरनेटची सुविधा पुरविण्यात आलेली नाही.
- मुलांच्या शैक्षणिक व मानसिक विकासासाठी शाळांमध्ये कायद्याने पालक-शिक्षक समिती स्थापन करणे गरजेचे असते ११ हजार ९४५ शाळांमध्ये पालक शिक्षक समिती स्थापन केलेली नव्हती.
- १९ हजार ८९८ शाळांमध्ये शाळा इमारत समिती स्थापन केली गेली नव्हती.
- ९ हजार ४४५ शाळांमध्ये शाळा प्रशासन व विकास समिती स्थापन केली गेली नव्हती.
- एकूण २३ हजार ७५३ शाळांपैकी ३ हजार ९०५ शाळांना कुंपण भिंतच बांधलेल्या नव्हत्या त्यामुळे मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता.
- १ हजार ९७५ शाळांमध्ये शाळांमध्ये प्रमुख नव्हते म्हणजे मुख्याध्यापकच नेमले गेलेले नाही.

- १ हजार ६९ शाळांमध्ये आजही वीज जोडणी (Electricity Supply) केली गेलेली नाही संगणक व इंटरनेट दूरच राहिले.
- माध्यमिक शाळा असून १४ हजार ८४१ शाळांमध्ये प्रयोग शाळाच नव्हत्या यावरून शाळांचा दर्जा काय असेल याची कल्पना येते.
- आजही राज्यातल्या २७ शाळा अशा आहेत ज्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध नाही.
- ५ हजार ७०१ अशा शाळा आहेत की, ज्या शाळांमध्ये अपंग विद्यार्थ्यांसाठी उतरंड बांधली गेलेली नाही.
- मुलांच्या सर्वांगीण विकासात खेळाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. असे असताना आजही १ हजार ३०७ शाळांना खेळाचे मैदान उपलब्ध नाही.
- शाळा प्रशासनाने आपल्या शाळेतील प्रत्येक मुलांची आरोग्य तपासणी करणे गरजेचे असते. २३ हजार ७५३ शाळापैकी ३ हजार ६६६ शाळांमध्ये मुलांची आरोग्य तपासणीच केलेली नव्हती.
- शाळेमध्ये ग्रंथालयाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.त्या ग्रंथालयाला ग्रंथपाल असणे आवश्यक आहे. आज १९ हजार ३३५ शाळांमध्ये ग्रंथालयाला ग्रंथपाल नाही यावरून लक्षात येते की, शाळांमधील ग्रंथालयाची काय अवस्था असेल.
- माध्यमिक शाळांमध्ये २ लाख १२ हजार ७६८ शिक्षक असून १९ हजार ३५९ (९%) टक्के शिक्षकांनी पदवीही मिळविलेली नाही.

*-स्त्रोत : डी.आय.एस.ई.चे संकेतस्थळावरुन माहिती प्राप्त*

## शालेय शिक्षण विभाग व इतर कार्यालयात रिक्त पदे :

- खुद्द शिक्षण विभागात गट 'ब' ची २४ पदे रिक्त आहेत, 'क' गटाची २५ पदे रिक्त आहेत तर 'ड' गटाची ६ पदे रिक्त.
- शिक्षण संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण यांची अ गट ते ड गटांची ६ हजार ७४३ पद संख्या मंजूर असून त्यापैकी ४ हजार १८३ पदे भरली गेली आहेत. तर २ हजार ५६० पदे आजही रिक्त आहेत.
- शिक्षण संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण यामध्ये गट अ ची ११३ पदे रिक्त आहेत. तर गट ब ची ९०२ पदे रिक्त आहेत. सर्वा जास्त गट क ची १ हजार २९३ पदे रिक्त आहेत.
- अ दर्जाच्या रिक्त पदांमध्ये शिक्षण सहसंचालकांची ५ पदे, शिक्षण उपसंचालकांमध्ये १० पदे, ४८ शिक्षणअधिकारी, ८ प्राचार्य, ४० जेष्ठ अधिव्याख्याता, १ प्रशासन अधिकारी अशी ११२ पदे रिक्त आहेत.
- ब गटांतील रिक्त पदांमध्ये ५३२ उपशिक्षण अधिकारी, ११० अधिव्याख्याता, २६६ अधिक्षक, ३ विधी अधिकारी अशा ९०२ पदांचा यांचा समावेश आहे.

# शालेय शिक्षण विभाग

सामाजिक आणि आर्थिक विकासाची प्रगती सुकर करण्यासाठी शिक्षणाचे महत्त्व सर्वमान्य आहे. शिक्षणामुळे वैयक्तिक आणि सामुहिक नावलौकिक मिळविण्याच्या संधी उपलब्ध होतात. लोकांना कौशल्य व ज्ञान मिळवून देऊन त्यांना उत्पादक रोजगारीची संधी मिळवून देणे आणि पर्यायाने राज्याच्या आर्थिक विकासाला गतिमान करण्यासाठी तसेच युवकांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी शिक्षण हे एक अत्यंत निर्णायक साधन आहे. शिक्षणाद्वारे व्यक्तीचे केवळ लेखन व वाचन संस्था विकसित करणे एवढेच अपेक्षित नसून व्यक्तीमधील सुप्त गुणांचा शोध घेऊन त्यांचा विकास करून, परिपूर्ण व्यक्तिमत्त्व घडविणे हे शिक्षणाचे अंतिम ध्येय आहे. त्यासाठी महाराष्ट्र राज्याला यापुढे भौतिक पायाभूत सुविधांसोबत (Physical Infrastructure) सामाजिक पायाभूत सुविधा (Social Infrastructure) निर्माण करण्यावर भर द्यावा लागणार आहे. महाराष्ट्रात भौतिक पायाभूत सुविधांसाठी ज्या गतीने निधी उपलब्ध होतो. तशीच गती शिक्षणाचा समावेश असणाऱ्या सामाजिक पायाभूत सुविधांवर करणे क्रमपात्र ठरते.

## मागील ८ वर्षांत शालेय शिक्षण विभागाचा सरासरी खर्च केवळ २१ हजार १६९ कोटी रुपये

*आलेख क्र. १.* *(रु. कोटीत )*




| | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | १०१३५ | १०९९५ | १३१५५ | १७३२९ | २४१०८ | २७७८७ | २९६३६ | ३३९५२ | ३५४६२ | ४०१४६ |
| सुधारित अंदाज | ११०१३ | १२३९६ | १४६७८ | २११५४ | २४६४६ | २६७२८ | ३०४५३ | ३३०९६ | ३६४२९ | |
| प्रत्यक्ष खर्च | १०७९७ | १२२२५ | १४८२३ | २००६२ | २३६९० | २६०७२ | २९०९२ | ३२५९३ | | |

*(स्त्रोत : वित्तविषयक विवरणपत्र व अर्थसंकल्पीय अंदाजपुस्तिका, निव्वळ रकमा)*

*टीप: वर्ष २०१४-१५चे सुधारित अंदाज व वर्ष २०१५-१६ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- वर्ष २००६-०७ ते वर्ष २०१३-१४ या मागील ८ वर्षांत शालेय शिक्षण विभागाचा सरासरी खर्च हा रू. २१ हजार १६९ कोटी ५० लाख इतका होता.
- मागील ८ वर्षांत सुधारित अंदाज हे मोठ्या स्वरूपात मांडले गेले मात्र विभागाला त्याप्रमाणात निधी उपलब्ध झाल्याचे दिसून येत नाही.
- त्यामुळे वर्ष २०१५-१६ चे अर्थसंकल्पीय अंदाज व वर्ष २०१४-१५ मधील सुधारित अंदाज हे मोठ्या स्वरूपात मांडले जाऊनही विभागाला मात्र त्यामानाने कमीच निधीची उपलब्धता होईल हे सांगणे सहज शक्य आहे.

# मागील ८ वर्षात राज्य अर्थसंकल्पाच्या योजनांतर्गत खर्चाच्या तुलनेत सर्वसाधारण शिक्षणावरील सरासरी योजनांतर्गत खर्च केवळ ३ टक्के

*आलेख क्र. २*

**सर्वसाधारण शिक्षणावरील योजनेतर व योजनांतर्गत खर्चाचे राज्याच्या योजनेतर व योजनांतर्गत खर्चाशी प्रमाण**




| | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| योजनांतर्गत खर्च | २.९८ | २.३८ | २.५२ | २.५२ | ३.५५ | ४.२६ | ३.६४ | ३.१३ | ४.४९ | ४.८६ |
| योजनेतर खर्च | १६.०६ | १७.७४ | १९.८६ | २३.५८ | २४.९६ | २३.८७ | २२.०७ | २४.२९ | २१.४२ | २३.११ |

*(स्त्रोत : वित्तविषयक विवरणपत्र व अर्थसंकल्पीय अंदाजपुस्तिका, निव्वळ रकमा)*
*(टीप: वर्ष २०१४-१५चे सुधारित अंदाज व वर्ष २०१५-१६चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- राज्य योजनेतील १०० रुपयांपैकी केवळ ३.०० रुपये हे सर्वसाधारण शिक्षणावर खर्च होतात.
- दहा वर्षांपूर्वी राज्य योजनेतील १०० रुपयांपैकी ५ रुपये सर्वसाधारण शिक्षणावर खर्च होत होते. परंतु मागील ८ वर्षांत त्यात सातत्याने घट होतांना आढळते **वर्ष २००७-०८ मध्ये तर केवळ २.३८ टक्के** इतके सर्वाधिक कमी होते. यातून शासनाची शिक्षणाप्रती असणारी उदासीनता स्पष्ट होते.
- वर्ष २०१५-१६ मध्ये शासनाने ४.८६ टक्के इतका योजनांतर्गत निधी तर २३.११ टक्के योजनेतर खर्च अर्थसंकल्पीत केला आहे.
- **शासन योजनांतर्गत खर्चात सतत कपात करत असताना योजनेतर खर्चात मात्र सातत्याने वाढ होत असल्याचे वरील आलेखावरून स्पष्ट होते.**
- **नंदूरबार, धुळे व मराठवाड्यामधील बऱ्याच जिल्ह्यांमध्ये शाळा सोडण्याचे प्रमाण हे ५० टक्क्यांपेक्षा अधिक आहे. तर १० वी मधील गळतीचे प्रमाण त्याहीपेक्षा अधिक आहे.** असे असूनही शिक्षण हक्काच्या कायद्याची अंमलबजावणी या भागामध्ये प्रभावीपणे होताना दिसत नाही.

# गेल्या ८ वर्षात शालेय शिक्षणाच्या तुलनेत प्राथमिक झालेला खर्च ५० टक्के

## शासनाचे आश्वासन मात्र ७५ टक्क्यांचे

लोकशाही आघाडी शासनाने सन २००० मध्ये जाहीर केलेल्या किमान समान कार्यक्रमात राज्य स्थूल उत्पन्नाच्या किमान ७ टक्के रक्कम शिक्षणासाठी राखून ठेवण्यात येईल व त्यापैकी ७५ टक्के रक्कम प्राथमिक शिक्षणासाठी प्राथम्याने राखून ठेवण्यात येईल असे म्हटले होते.

*आलेख क्र. ३*




| | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| श्रेणी१ | ४६.०० | ५०.६० | ५१.०० | ५१.६० | ४८.५७ | ५३.१० | ५२.५० | ५१.२५ | ५१.७८ | ५०.१६ |

*(स्रोत: खर्चाचा प्रधानशीर्ष नि विभागवार सारांश व लोकलेखा, अर्थसंकल्पीय अंदाजपुस्तिका, निव्वळ रकमा)*
*(टीप: वर्ष २०१४-१५ चे सुधारित अंदाज व वर्ष २०१५-१६ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- लोकशाही आघाडी शासनाच्या किमान समान कार्यक्रमातील आश्वासनानुसार राज्य शासन शिक्षणावर होणाऱ्या खर्चापैकी ७५ टक्के रक्कम प्राथमिक शिक्षणावर खर्च करणार होती. मात्र वरील आलेखात दर्शविल्याप्रमाणे शासनाने एकाही वर्षी आपली उक्ती सार्थ करून दाखविली नाही.
- २०१२-१३ मध्ये शिक्षणावरील एकूण खर्चापैकी सर्वाधिक ५२.५० टक्के रक्कम प्राथमिक शिक्षणासाठी निधी उपलब्ध झाला होता. वर्ष २०१३-१४ मध्ये त्यात १.२५ टक्क्यांनी घट होऊन ५१.२५ टक्के निधी उपलब्ध झाला.
- वर्ष २००६-०७ ते २०१३-१४ या ८ वर्षात शिक्षणावर होणाऱ्या एकूण खर्चात प्राथमिक शिक्षणावर होणारा सरासरी खर्च केवळ ५०.५७ टक्के राहिला आहे.
- **गेल्या ८ वर्षात प्राथमिक शिक्षणासाठी सर्वात जास्त निधी वर्ष २०११-१२ मध्ये ५३.१० टक्के उपलब्ध झाला आहे.**
- **वर्ष २०१५-१५ मध्ये नव्याने आलेल्या शासनानेही प्राथमिक शिक्षणाप्रती आस्था दाखविलेली नाही. प्राथमिक शिक्षणासाठी ७५ टक्के निधी राखून ठेवणे अपेक्षित होते. मात्र प्रत्यक्षात ५०.१६ टक्के निधी राखून ठेवला आहे म्हणजे उपलब्ध त्याहीपेक्षा कमी होणार हे निश्चित.**

# राज्य अर्थसंकल्पापैकी सर्वसाधारण शिक्षणावर होणारा खर्च १६.९२ टक्के

*आलेख क्र.४*




| | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| टक्केवारी | १३.१८ | १३.७४ | १५.४२ | १७.८८ | १९.५२ | १८.९४ | १७.५० | १९.२१ | १६.९० | १७.७३ |

*(स्रोत : संक्षिप्त अर्थसंकल्प, व खर्चाचा प्रधान शीर्षवार नि विभागवार सारांश व लोकलेखा, निव्वळ रकमा)*
*(टीप: वर्ष २०१४-१५ चे सुधारित अंदाज व वर्ष २०१५-१६चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- राज्य अर्थसंकल्पापैकी सर्वसाधारण शिक्षणावर मागील ८ वर्षांत सरासरी १६.९२ टक्के इतका खर्च करण्यात आला.
- वर्ष २००६-०७ मध्ये ते सर्वात कमी १३.१८ टक्के इतके होते. तर वर्ष २०१०-११मध्ये ते सर्वात जास्त १९.५२ टक्के इतके होते.
- गेल्या ८ वर्षात वर्ष २०१०-११ मध्ये सर्वात अधिक म्हणजे १९.५२ टक्के निधी उपलब्ध झाला.
- वर्ष २०१४-१५ व २०१५-१६ मधील सर्वसाधारण शिक्षणावर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण हे जरी जास्त स्वरूपात दर्शविले गेले असले तरी ते प्रत्यक्ष रकमा हाती आल्यावर कमी होतील असा अंदाज लावता येणे शक्य आहे.
- **मागील ८ वर्षात सर्वसाधारण शिक्षणावर होणारा खर्च हा राज्य अर्थसंकल्पाशी तुलना करता कधीच २० टक्क्यांपेक्षा जास्त झालेला नाही.**

# सर्वसाधारण शिक्षण व तंत्रशिक्षणावरील खर्च
# राज्य स्थूल उत्पन्नाच्या केवळ २.४० टक्के

*आलेख क्र.५*




| | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| टक्केवारी | २.३८ | २.३१ | २.३० | २.४२ | २.४८ | २.४५ | २.५२ | २.४९ | २.४२ | २.३७ |

*(स्त्रोत : संक्षिप्त अर्थसंकल्प, व खर्चाचा प्रधान शीर्षवार नि विभागवार सारांश व लोकलेखा, निव्वळ रकमा)*
*(टीप: शिक्षणावरील एकूण खर्चात २२०२, सर्वसाधारण शिक्षण व २२०३, तंत्र शिक्षण यांचा समावेश आहे)*
*(टीप: वर्ष २०१४-१५चे सुधारित अंदाज व वर्ष २०१५-१६चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- शिक्षणावरील खर्च हा २२०२, सर्वसाधारण शिक्षण व २२०३, तंत्र शिक्षण या प्रधान शीर्षांच्या अंतर्गत होतो. या दोन्ही शीर्षांवर होणाऱ्या खर्चाचे राज्य स्थूल उत्पन्नाशी असलेले प्रमाण वर्ष २००६-०७ ते २०१३-१४ पर्यंत सरासरी २.४१ टक्के इतके होते.

- वर्ष २००६-०७ मध्ये सर्वसाधारण शिक्षण व तंत्र शिक्षण यावर खर्चाचे प्रमाण २.३८ टक्के एवढे होते, पुढे हे प्रमाण सातत्याने कमी होत गेले व वर्ष २००८-०९ मध्ये ते २.३० टक्क्यांवर आले.

- वर्ष २०१२-१३ मध्ये हे प्रमाण पुन्हा वाढून २.५२ टक्के इतके झाले मात्र वर्ष २०१३-१४ नंतर पुन्हा त्यात घट होऊ लागली आहे.

- **वर्ष २०१५-१६ मध्ये सर्वसाधारण शिक्षण व तंत्र शिक्षण यावरील खर्चाचे प्रमाण केवळ २.३७ टक्के इतकेच अर्थसंकल्पीत करण्यात आले आहे.म्हणजे सर्वसाधारण शिक्षण व तंत्र शिक्षणावर होणारा खर्च २००९-१० पेक्षाही कमी अर्थसंकल्पीत झाला आहे.**

- **वर्ष २०१२-१३ मध्ये सर्वसाधारण शिक्षण व तंत्र शिक्षणावर राज्य स्थूल उत्पन्नाच्या तुलनेत २.५२ टक्के खर्च करण्यात आले होते. हे प्रमाण गेल्या ८ वर्षात सर्वात अधिक राहिले आहे.**

# महाराष्ट्र राज्याचा शिक्षणविषयक नियतव्यय राज्य योजनेत केवळ ३.४१ टक्के

## महाराष्टात शिक्षणासाठी एकूण योजनेत केवळ ३.४१ टक्के नियतव्य

## (वर्ष २०१२-१३)




(स्त्रोत:नियोजन आयोग, २०१२-१३)

- वर्ष २०१२-१३ मध्ये काही प्रमुख राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्याने आपल्या एकूण योजनेत शालेय शिक्षणासाठी निश्चित केलेले नियतव्यय सर्वात कमी म्हणजे केवळ ३.४९ टक्के आहे.

- गोवा, गुजरात, जम्मू काश्मिर व मिझोराम या ४ राज्यांनी वर्ष २०१२-१३ मध्ये आपल्या एकूण योजनेच्या १४ टक्के नियतव्यय निश्चित केला होता.

- महाराष्ट्र सोडता उत्तराखंड या राज्याने शिक्षणासाठी १२.१५ टक्के निधी निश्चित केला होता. तो महाराष्ट्रापेक्षा ८.७४ ने अधिक होता.

- जम्मु काश्मिर सारखे राज्य देखील शिक्षणाचे महत्त्व ओळखुन खर्च करत असेल तर महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्याने शिक्षणासारख्या मूलभूत बाबीकडे प्राधान्याने लक्ष देणे गरजेचे आहे.

***अर्थसंकल्पात सांगितल्या प्रमाणे शालेय शिक्षणावर ३० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च करण्यात येत असला तरी गुणात्मक फरक दिसून येत नाही. वर्ष २०१५-१६ मध्ये 'शिक्षण हक्क कायद्याच्या' अंमलबजावणीसाठी १ हजार ६९० कोटी ५६ लाख एवढा निधी राखून ठेवल्याचे म्हटले असले तरी तेवढा खर्च होईलच असे नाही. तसेच विभागाने राज्याच्या एकूण महसुली जमेच्या १/६ निधी खर्च करणे गरेचे आहे.***

*-स्त्रोत:अर्थसंकल्प, २०१५-१६ आणि कार्यक्रम अंदाजपत्रक, २०१५-१६ शालेय शिक्षण (प्राथमिक शिक्षण)*

# खुद्द शालेय शिक्षण विभाग, मंत्रालयात ५५ पदे रिक्त

- **खुद्द शिक्षण विभागात गट 'ब' ची २४ पदे रिक्त आहेत, 'क' गटाची २५ पदे रिक्त आहेत तर 'ड' गटाची ६ पदे अशी एकूण ५५ पदे रिक्त.**

*-स्त्रोत: माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती, २२ ऑगस्ट, २०१४*

## शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अधिपत्याखालील कार्यालयाची माहिती

### दि. ३०.०६.२०१४ अखेर सर्व संवर्गातील भरण्यात आलेली पदे व रिक्त पदे यांची एकत्रित माहिती

| कार्यालयाचे नाव | गट | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | रिक्त पदांची मंजूर पदांशी % |
|---|---|---|---|---|---|
| शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) | अ | ४१३ | ३०० | ११३ | २७.३६ |
| | ब | १७७२ | ८७० | ९०२ | ५०.९० |
| | क | ३५१३ | २२२० | १२९३ | ३६.८० |
| | ड | १०४५ | ७९३ | २५२ | २४.११ |
| | **एकूण** | **६७४३** | **४१८३** | **२५६०** | **३७.९६** |

*स्त्रोत: माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती, २२ ऑगस्ट, २०१४*

- **शिक्षण संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण यांची अ गट ते ड गटांची ६ हजार ७४३ पद संख्या मंजूर असून त्यापैकी ४ हजार १८३ पदे भरली गेली आहेत. तर २ हजार ५६० (३८%) पदे आजही रिक्त आहेत.**
- शिक्षण संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण यामध्ये गट अ ची ११३ (२७.३६%) पदे रिक्त आहेत. तर गट ब ची ९०२ (५१%) पदे रिक्त आहेत. सर्वा जास्त गट क ची १ हजार २९३ (३७%) पदे रिक्त आहेत.
- **'अ' दर्जाच्या रिक्त पदांमध्ये शिक्षण सहसंचालकांची ५ पदे, शिक्षण उपसंचालकांमध्ये १० पदे, ४८ शिक्षणअधिकारी, ८ प्राचार्य, ४० जेष्ठ अधिव्याख्याता, १ प्रशासन अधिकारी अशी एकूण ११२ पदे रिक्त आहेत.**
- 'ब' गटांतील रिक्त पदांमध्ये ५३२ उपशिक्षण अधिकारी, ११० अधिव्याख्याता, २६६ अधिक्षक, ३ विधी अधिकारी अशा ९०२ पदांचा समावेश आहे.

- **राज्यातील गटशिक्षण अधिकाऱ्यांची पदे गेली १० वर्षांपासून अधिक काळ रिक्त आहेत. तर शहरी भागांतील शाळांमध्ये अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.**
- तसेच राज्यातील प्राथमिक शिक्षणाचा विचार करता राज्यात असलेल्या **९६ हजार १७९ शाळापैकी १ हजार ९२३ शाळा एकशिक्षकी आहेत. ३ हजार ३ ६६ शाळा या एकाच वर्गात भरल्या जात आहेत.**

# केळकर समितीने आभ्यासलेली राज्यातील शिक्षणाची स्थिती आणि केलेल्या शिफारशी

- ☞ **शिक्षणाच्या हक्कामध्ये व राज्य सरकारच्या भौतिक पायाभूत सोयी सुविधांसाठी विहित केलेली मानके व प्रमाणके साध्य केली पाहिजेत. आणि टिकवून ठेवली पाहिजेत. आणि या संदर्भात काहीही खपवून घेता काम नये.**
- ☞ **तसेच यासाठी पुरेशी वित्तीय तरतूद केली पाहिजे शिक्षणासाठी रक्कम कमी पडू देता कामा नये.**
- ☞ शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी अध्यापनशास्त्रात शिक्षकांचे पुनर्प्रशिक्षण करण्याची गरज आहे.
- ☞ **राज्यात विविध भागांतील लौकिक असलेल्या संस्थांना, मागासलेल्या क्षेत्रांमध्ये व अधिक विशेष म्हणजे आदिवासी क्षेत्रामध्ये त्यांची शैक्षणिक प्रांगणे (कॅंपस) उभारण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे.**
- ☞ **शिक्षणामध्ये माध्यमस्तर व तांत्रिक स्तरावरील शिक्षणाचा समावेश केला गेला पाहिजे.**
- ☞ प्राथमिक शिक्षणाच्या इयत्ता ४थी नंतरच्याव इयत्ता ५वी नंतरच्या स्तरांवर सरकारी परीक्षा सुरु करण्यात याव्यात. ही परीक्षा गंभीरपणे घेण्यात यावी आणि प्राथमिक स्तरावर देण्यात येत असलेल्या शिक्षणाच्या दर्जाचे मोजमाप म्हणून या परीक्षांच्या निकालांचा वापर करण्यात यावा.
- ☞ मराठवाड्यामध्ये मुलींच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. आणि म्हणून महिलांसाठी वस्तीगृहे व अन्य पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अतिरिक्त वित्तीय तरतूद करण्यात यावी.
- ☞ **राज्याच्या काही भागात असलेला निरक्षरतेचा उच्च स्तर, हा अजूनही ''शाळाबाह्य'' मुलांना परिणामकारकपणे शिक्षणव्यवस्थेत सामावून घेण्यात न आल्यामुळे आहे त्यात सुधारणा करण्याबाबत शासनाने अधिक लक्ष देणे गरजेचे आहे.**
- ☞ **जरी साक्षरता दर ८२ टक्के असला तरी निरक्षरांची एकूण संख्या देखील खुपच जास्त आहे. महाराष्ट्रासारख्या राज्यात हे अपेक्षित नाही. साधन संपत्तीचा सुयोग्य वापर आणि विद्यमान धोरणांची परिणामकारक अंमलबजावणी या मध्यमातून ही परिस्थिती सुधारण्याची आवश्यकता आहे.**
- ☞ महिलांमधील निरक्षरता ही अधिक असून, त्यावर लक्ष केंद्रीत करण्याची आणि खास करून नंदूरबारसारख्या भागामध्ये कडक मोहिम राबवून याकडे गभीरपणे लक्ष देण्याची गरज आहे.
- ☞ २०११ च्या जनगणनेत प्रत्येक जिल्हयाच्या तालुक्यांमधील साक्षरता दराची माहिती दिली आहे. यावरून लक्षात येणारी बाब म्हणजे साक्षरता दर निर्देशांकानुसार जिल्हा जरी प्रगत असला तरी त्यात अनेक तालुके अप्रगत दिसून येतात. **उदा. ठाणे जिल्हयाचा साक्षरता दर २०११ च्या जनगणनेनुसार ८६.२ टक्के आहे. तर तलासरि तालुक्यात ५८.९%, विक्रमगड ५७.८%, जव्हार ५८.६%, आणि मोखाडा तालुक्यात ५८.४% इतका साक्षरता दर नोंदविण्यात आला आहे. या जिल्ह्यांमधील महिला साक्षरता दर त्याहीपेक्षा कमी म्हणजे ४६ ते ५१ टक्के इतका आहे. हे मुख्य आदिवासी जिल्हे आहेत. आणि या जिल्ह्यांकरिता विशेष उपायोजना करणे आवश्यक आहे.**
- ☞ **ठाणे जिल्ह्यात रोजगारासाठी स्थलांतर करणाऱ्यांचे प्रमाण सर्वात जास्त असल्याने स्थलांतरित मुलांचे प्रमाणही या जिल्हयात सर्वात अधिक आहे.**

# सर्व शिक्षा अभियान

*रु. कोटीत*

| वर्ष | अर्थसंकल्पीय अंदाज | अनुदान वितरण | | आरंभीची रक्कम व इतर जमा रक्कम मिळून एकूण रक्कम | उपलब्ध निधी | जमा रकमेशी उपलब्ध निधीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | केंद्र शासन | राज्य शासन | | | |
| २००९-१० | १२१३ | ५६४ | ३८४ | १३३२ | १०९० | ८१.८३ |
| २०१०-११ | २०७७ | ८५५ | ४६० | १५६१ | १३४८ | ८६.३५ |
| २०११-१२ | २९३४ | ११७९ | ६३५ | २०९० | १७३१ | ८२.८२ |
| २०१२-१३ | २६१४ | १०६८ | ५३५ | २०२५ | १४८८ | ७३.४८ |
| २०१३-१४ | १२९९ | ६५६ | २५३ | ११९३ | ९९३ | ८३.२३ |
| २०१४-१५ | १४१९ | ३०६ | ३०४ | ८४० | ४१३ | ४९.१६ |
| **एकूण** | **११५५६** | **४६२८** | **२५७१** | **९०४१** | **७०६३** | **७८.१२** |

*स्त्रोत: कार्यक्रम अंदाजपत्रक , शालेय शिक्षण व क्रिडा विभाग (प्राथमिक शिक्षण) २०१५-१६*

- ☞ सर्व शिक्षा अभियान हे राज्यभर राबविले जात असून त्यामध्ये सर्व शालेय भौतिक सुविधांचा समावेश होत.
- ☞ शालेय शिक्षणावर वर्ष २००९-१० ते २०१४-१५ या ५ वर्षाच्या कालावधीत ९ हजार ४१ कोटी निधी जमा झाला होता **परंतु प्रत्यक्ष खर्च होताना १ हजार ९७८ कोटी रुपयांची घट झाली. म्हणजे ७ हजार ६३ कोटी रुपये खर्च करण्यात आले. खर्च होण्याचे प्रमाण ७८.१२ टक्के राहिले आहे.**
- ☞ वर्ष २०१४-१५ मध्ये ८४० कोटी रुपये जमा झालेत व खर्च मात्र ४१३ कोटी रुपये करण्यात आले. म्हणज केवळ ४९ टक्के रक्कम खर्च करण्यात आली आहे.

## सर्व शिक्षा अभियान उपक्रमातील काही प्रमुख बाबी:

- ☞ **शालेय शिक्षण विभागाच्या (प्राथमिक शिक्षण)कार्यक्रम अंदाजपत्रकात दिलेल्या महितीनुसार राज्यात २ लाख १८ हजार ७९९ शाळाबाह्य मुले आहेत.**
- ☞ प्राथमिक शाळेत जाणाऱ्या दारिद्रयरेषेकालील मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी करून शाळेतील मुलींची उपस्थितीचे प्रमाण वाढविण्यासाठी इयत्ता १ली ते ४थी मधील प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या मुलींना दररोज १ रुपया या प्रमाणे २२० रुपये उपस्थिती भत्ता दिला जातो. वर्ष २०१३-१४ मध्ये ४ लाख ९१ हजार १३६ मुलींनी या योजनेचा लाभ घेतला व या योजनेवर १० कोटी ८० लाख ५० हजार खर्च करण्यात आला होता.
- ☞ **वर्ष २०१५-१६ मध्ये या लाभार्थी मुलींची संख्या २० हजार ३९१ ने कमी होऊन ४ लाख ७० हजार ७४५ झाली आहे.**

  **दररोज केवळ १ रुपया उपस्थिती भत्ता म्हणजे गरीबांची चेष्टा आहे असेच म्हणावे लागेल.**
- ☞ प्राथमिक शाळेतील पुस्तक पेढी योजना वर्ष २००४-०५ पासून राबविण्यात येत आहे. इयत्ता १ली ते ७वी च्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती विमुक्त जाती भटक्या जमाति तसेच आर्थीकदृष्टया कमकुवत घटकातील विद्यार्थ्यांना पुस्तके उपलब्ध करून दिली जातात परंतु वर्ष २०१३-१४ मध्ये एकाही लाभार्थ्याला पुस्तके देण्यात आलेली नाही.

## सैनिकी शाळांतून अवघे ३० विद्यार्थीच 'एनडीए'त

### १६ वर्षांत ३३ शाळांवर २०० कोटींचा खर्च

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीतील (एनडीए) मराठी विद्यार्थ्यांचा टक्का वाढावा म्हणून तात्कालीन युती सरकारने राज्यात सैनिकी शाळा सुरु केल्या. पण गेल्या १६ वर्षात या शाळांवर २०० कोटी खर्च करून आतापर्यंत केवळ ३० विद्यार्थीच एनडीएत दाखल झाले आहेत. वर्ष १९९६-९७ मध्ये राज्यात ३९ सैनिकी शाळा स्थापन करण्यास परवानगी दिली. त्यान ३ मुलींच्या सैनीकी शाळा आहेत मात्र मुलींना एनडीएत प्रवेश नाही.

प्रत्येक शाळेतील प्रत्येक मुलाला एनडीएच्या परीक्षेला बसविणे नियमाने बंधनकारक असते परंतु इतर कोणतीच शाळा हा नियम पाळताना दिसत नाही.

*-संतोष शाळिग्राम, सकाळ दि. १५ डिसेंबर २०१४*

**मान. शालेय शिक्षण मत्र्यांनी राज्यात असलेल्या ३३ जिल्ह्यांतील ४२ सैनिकी शाळांची सद्या काय स्थिती आहे ते तपासावे तसेच ज्या ३ मुलींच्या सैनिकी शाळा आहे त्यांना एनडीएत कसा प्रवेश मिळेल यासाठी प्रयत्न केला जावा. तसेच गेल्या १६ वर्षात या ३९ सैनिकी शाळांवर २०० कोटी रुपये खर्च झाले असतील तर या निधीचे नक्की काय झाले, या योजनेची अंमलबजावणी का होऊ शकली नाही याची चौकशी करण्यात यावी तसेच सुसंस्कृत तरूण घडवण्यात आडकाठी आणनाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी. वर्ष २०१४-१५ मध्ये १७ हजार ७९६ एवढी मोठी पटसंख्या असताना केवळ ३० विद्यार्थी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीत दाखल झाले आहेत.**

## दुरुस्ती अभावी अनेक शाळा धोकादायक

### निधी नाही: इमारतीची दुरुस्ती रखडली, विद्यार्थी संकटात.

वसई विरार भागातील जिल्हापरिषद शाळांची अवस्था अत्यंत बिकट झाली असून सन २०१२ नंतर सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत मिळणारे अनुदान अद्याप न मिळाल्यामुळे अनेक इमारतींची दुरावस्था झाली आहे. गेल्या अनेक वर्षापासून वसईतील शिक्षण विभागाला पूर्ण वेळ गटशिक्षण अधिकारी नाही. त्यामुळे शीक्षण विभागाचे काम पूर्णपण विस्कळीत झाले आहे.

**प्राथमिक शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांची असल्याने, प्राथमिक शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना पुरेशा प्रमाणात व सुस्थितीत वर्गखोल्या बांधून देणे व पर्यायाने गळतीचे प्रमाण कमी करणे तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक सोय ही आरोग्यदृष्टया चांगली ठेवणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. जिल्हास्तर शिक्षणअधिकारी यांच्यामार्फत तर उपप्रदेशात गटशिक्षण अधिकाऱ्यांच्या मार्फत ही यंत्रणा कार्यान्वीत होते. मात्र गेल्या अनेक वर्षापासून वसई उपप्रदेशात गटशिक्षण अधिकाऱ्याचे पद रिक्त आहे. राज्याच्या ईतर भागातही शिक्षणविषयक अनेक महत्त्वाची पदे रिक्त असून त्याचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर अनिष्ट परिणाम होत आहे.**

## व्यवसाय मार्गदर्शनापासून १७ जिल्ह्यातील विद्यार्थी वंचित

### शिक्षणअधिकाऱ्यांच्या उदासिनतेमुळे लाखोंचा निधी विनावापर पडून

दर वर्षी सुमारे १७ लाख विद्यार्थी दहावीची परीक्षा उत्तीर्ण होतात, या विद्यार्थ्यांना करिअर निवडतना मार्गदर्शन व्हावे यासाठी राज्यातील ३६ जिल्ह्यांना राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत गेल्या वर्षी २ कोटी २२ लाखांचा निधी वितरीत करण्यात आला; पण ३६ पैकी अकोला बुलढाणा, चंद्रपूर, धुळे, गडचिरोली जालना, नांदेड, परभणी, पुणे, रायगड, सांगली, सातारा, सोलापूर, वर्धा, वाशीम, यवतमाळ, सिंधुदूर्ग या १७ जिल्ह्यांच्या शिक्षणअधिकाऱ्यांनी या महत्त्वकांक्षी उपक्रमाला निधी मिळूनही केराची टोपली दाखवली या शिक्षणअधिकाऱ्यांच्या उदासिनतेमुळे निधी पडूनच आहे.

**'वेध भिविष्याचा' या लाविण्यपूर्ण उपक्मातून विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या अभ्यासक्रमांची माहिती द्यावी, असे अपेक्षित होते. त्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी एक कार्यकारी समिती गठीत करणे आवश्यक होते. तरी विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणाऱ्या उपक्मापासून लाखो विद्यार्थ्यांना वंचित ठेवणाऱ्यांविरोधात मान. शिक्षणमंत्री कोणती कारवाई करणार आहेत याची माहिती सदनाला देण्यात यावी.**

*दै.लोकसत्ता, २३ मार्च २०१५ व दै.लोकमत, २५ मार्च, २०१५*

## महाराष्ट्रात शिक्षणाचा अधिकार केवळ १९ टक्क्यांना

### अहवालात उघड झाले महाराष्ट्रातील चित्र

शिक्षण अधिकाराच्या अंमलबजावणीत 'प्रगतशील' महाराष्ट्रान गेल्या ५ वर्षात १ लाख ४३ हजार शिक्षणापासून वंचित मुलांपैकी जेमतेम २७ हजार १२९ मुलांपर्यंतच राज्यात शिक्षणाची गंगा पोहचविली आहे. हे प्रमाण ठरविलेल्या लक्षाच्या जेमतेम १९ टक्के एवढे कमी आहे. 'आयआयएम' अहमदाबाद, 'सेंट्रल फॉर स्वेअर फॉउंडेशन' आणि सेंटर फॉर लीगल पॉलीसी व अकाउंटेबिलीटी इनिशिएटीव्ह' यांनी सर्व राज्यात माहिती अधिकाराचा वापर करून मिळविलेल्या माहितीच्या आधारे अहवाल तयार केला.

*दै. सकाळ, २७ मार्च, २०१५*

***या संशोधनांतर्गत शिक्षणअधिकार कायदा संमत केल्यानंतर त्याच्या अंमलबजावणी बाबत राज्यांना केंद्राकडूनच योग्य मार्गदर्शन दिले गेले नाही. परिणामी, बहुतांश राज्यात जुनीच शिक्षण व्यवस्था आजही सुरु आहे. त्यातून वंचित, शाळाबाह्य मुलांना शिक्षणाची सुविधा मिळू शकत नाही. फी माफी केवळ शैक्षणिक शुल्कावर आहे. की त्यात पुस्तके, शालेय साहित्य, गणवेश याचाही समावेश आहे. हेच अनेक राज्यांना स्पष्टपणे माहित नसल्याचे आढळले आहे.***

*शिक्षण संशोधक-डॉ. अर्ध्यसेन गुप्ता*

**कार्यक्रम अंदाजपत्रक शालेय शिक्षण विभाग (प्राथमिक शिक्षण) यांनी दिलेल्या माहिती नुसार महाराष्ट्रामध्ये वर्ष २०१२-१३ मध्ये २ लाख १८ हजार ७९९ एवढी शाळाबाह्य वंचित मुल होती. त्यापैकी ५९ हजार ५२४ (२७%) मुलांना शिक्षणात सामावून घेता आले व त्यांच्यासाठी ११७ कोटी ८ लाख ७२ हजार एवढा निधी मंजूर करण्यात आला होता मात्र खर्च १८ कोटी ५१ लाख रुपये ( १६%) झाला आहे. यावरून आपल्याला वंचित, शाळाबाह्य मुलांची स्थिती किती दयनीय आहे याची कल्पना येते. सदर शाळाबाह्य मुलांचा आकडा हा कोणतेही सर्वेक्षण न करता दिलेला आहे.त्यामुळे त्या आकड्याबाबतही शंका निर्माण होते.**